**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग

शासन पत्र क्र. H.D.-65018/3/2026-O/o Pr.Secy3-MHD-Home

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई. पिन – ४०० ०३२.

दिनांक :- २० एप्रिल,२०२६.

**<u>जाहिरात</u>**

विषय :- महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम, १९५६ अन्वये प्राप्त व इतर अपिलांवर सुनावणीसाठी अपिलीय प्राधिकारी यांना सहाय्य करण्याकरिता सेवानिवृत अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम, १९५६ अन्वये अपिलार्थी पोलीस कर्मचारी /अधिकारी यांना क्षेत्रिय कार्यालयाने दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने व इतर नियमानुसार अपीले गृह विभागास प्राप्त होतात. सदर अपिलावरील सुनावण्या शासनस्तरावर घेण्यात येतात. या अपिल प्रकरणात सक्षम प्राधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची अर्हता व कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील-

| पद | अर्हता | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| अपिलीय प्राधिकारी यांचे सहायक (पद संख्या-०१) | १.वेतनश्रेणीः-<br>वेतनस्तर- S-१०/S-११/S-१२<br>२. वय- इच्छुक अधिकाऱ्याचे वय ७० वर्षांपेक्षा कमी असावे.<br>३. केंद्र सरकार व राज्य शासनाच्या सेवेतील सेवानिवृत्त झालेले सह सचिव/ उप सचिव /अवर सचिव/ कक्ष अधिकारी दर्जाचा अधिकारी<br>४. विभागीय चौकशीची प्रकरणे हाताळण्याचा अनुभव आवश्यक<br>५. मराठी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक<br>६.मराठी दस्तऐवज इंग्रजीमध्ये भाषांतरीत करता येणे आवश्यक<br>७. सेवानिवृत्तीनंतर सद्यस्थितीत अन्य आस्थापनेवर कार्यरत नसावा. | १.अपिलीय प्राधिकारी यांना अपिलांच्या सुनावणीवेळी सहाय्य करणे.<br>२.मराठी भाषेतील कागदपत्रांचा इंग्रजी अनुवाद करणे.<br><br>३. शिस्तभंग विषयक कार्यवाही दरम्यान उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने परिच्छेदनिहाय अभिप्राय (Para wise Reply) तयार करणे. |

निवड झालेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे मानधन हे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ नुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन

(अंशराशीकरण मूल्य विधारात न घेता) त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

गृह विभागाने सोपलेल्या अपिलावरील सुनावणी प्रकरणांच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी व शर्ती निवड झालेल्या अधिकाऱ्यावर बंधनकारक राहतील. इच्छूक सेवानिवृत अधिका-यांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांची इच्छुकता खालील नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर विहित नमुन्यात पाठवावी. (अर्जाचा विहित नमुना शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

ई-मेल:- hdo२.home@maharashtra.gov.in

सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(चेतन रा.चव्हाण)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

## अर्जाचा नमुना

१. अधिकाऱ्याचे नांव-

२. पत्ता-

३. मोबाईल क्रमांक -

४. ई-मेल आय. डी.-

५. जन्म दिनांक-

६. दि.०१.०१.२०२६ रोजीचे वय-

७. सेवानिवृत्तीचा दिनांक -

८. सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व पे-स्केल -

९. सेवानिवृत्तीपूर्वी घेतलेले शेवटचे वेतन-

१०. सध्या सेवानिवृत्ती वेतन -

११. ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभाग / कार्यालय -

१२. विभागीय चौकशीच्या कामाचा / न्यायालयीन प्रकरणांचा अनुभव -

१३. विभागीय चौकशी मध्ये पूर्ण केलेल्या कामाचा सविस्तर तपशील -

१४. सेवेत असताना झालेली शिक्षा किंवा विभागीय चौकशीस सामोरे गेले आहेत किंवा कसे असल्यास, त्याचा सविस्तर तपशील -

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी